# <u>आयुर्विद्या मासिकाचा ८६वा वर्धापन दिन साजरा!</u>

दि. १ जून २०२३ रोजी आयुर्विद्या मासिकाचा ८६वा वर्धापन दिन टिळक आयुर्वेद महाविद्यालयाच्या एन.आय.एम.ए सभागृहात संपन्न झाला.या प्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.दि.प्र.पुराणिक, प्रमुख अतिथी दैनिक महाराष्ट्र टाइम्स चे संपादक मा. श्री. पराग करंदीकर, रा. शि. मंडळाचे उपाध्यक्ष डॉ.भा.कृ.भागवत, सचिव डॉ.राजेंद्र हुपरीकर, महविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सदानंद देशपांडे,आयुर्विदया मासिक समिती च्या सचिव व उपसंपादक डॉ. विनया दीक्षित, कार्यकारी संपादक डॉ.अपूर्वा संगोराम उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उपस्थितांचे स्वागत डॉ. विनया दीक्षित यांनी केले. या वेळी त्यांनी आयुर्विद्याच्या आत्तापर्यंतच्या वाटचालीचा आढावा घेतला.

कार्यक्रमासाठी उपस्थित व्यासपीठावरील मान्यवरांचा परिचय व स्वागत डॉ. अपूर्वा संगोराम यांनी केले.

या प्रसंगी आयुर्विद्या मासिकाच्या स्वास्थ्यरक्षण व योग या वर्षारंभ विशेषांकाचे जून २०२३ चे प्रकाशन प्रमुख अतिथी मा. श्री. पराग करंदीकर  यांचे हस्ते झाले. आयुर्विद्या मासिकामधील उत्तम लेखासाठी दिले जाणारे डॉ. सुभाष रानडे व डॉ. सुनंदा रानडे फाऊंडेशन पुरस्कृत पारितोषिकांचे वितरण व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते झाले. तसेच या प्रसंगी पी.एच. डी. प्राप्त यशस्वी स्नातक व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ परिक्षांमध्ये विशेष श्रेणी मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचाही सत्कार मा. प्रमुख अतिथी व मा. अध्यक्षांच्या हस्ते करण्यात आला.

या प्रसंगी बोलताना मा. श्री. पराग करंदीकर यांनी आयुर्वेदाचे महत्त्व विषद करून, सातत्याने गेली ८६ वर्षे आयुर्विद्या प्रकाशित केल्याबद्दल संस्थेचे  अभिनंदन केले. सामाजिक मधुमेह हा समाजात पसरत चाललेला सर्वात मोठा रोग असून स्वयं शिस्तीने त्याला आळा घातला पाहिजे असे मत त्यांनी या प्रसंगी बोलताना व्यक्त केले .आयुर्विदया मासिकाच्या वाटचालीला  शुभेच्छा दिल्या.

मा. अध्यक्ष डॉ. दि. प्र. पुराणिक यांनीही आयुर्विद्या मासिक, आयुर्विद्या इंटरनॅशनल, इ आयुर्विद्या आणि आरोग्यदीप दिवाळी अंकाची आत्तापर्यंतची वाटचाल या बाबत समाधान व्यक्त केले व शुभेच्छा दिल्या. तसेच राष्ट्रीय शिक्षण मंडळाच्या शताब्दी वर्षानिमित्त वर्षभर आयुर्वेदावरील  विविध विशेषांकाचे प्रकाशन होणार असल्याचे जाहीर केले तसेच शताब्दी वर्षानिमित्त आरोग्यविषयक भव्य प्रदर्शन , चर्चासत्र, सेमिनार, आरोग्य तपासणी शिबिरे यांचेही आयोजन करण्यात येणार असल्याचे नमूद केले.

आयुर्विद्या मासिक समितीचे सदस्य डॉ. नंदकिशोर बोरसे यांनी आभार प्रदर्शन केले.

आयुर्विद्या मासिक समिती सदस्य डॉ. सरोज पाटील आणि डॉ. मिहिर हजरनविस यांनी कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन केले.